
# महाराष्ट्रातील अनमोल रत्ने



महात्मा जोतिबा फुले
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
लोकमान्य टिळक
वि. स. खांडेकर
डॉ. व्ही. शांताराम
शंतनुराव किर्लोस्कर
डॉ. बाबा आमटे
लता मंगेशकर
डॉ. जयंत नारळीकर
सुनिल गावसकर

डॉ. उषा खंदारे

# अनुक्रमणिका

१) महात्मा जोतीबा फुले ........................................१

२) लोकमान्य टिळक ............................................२३

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ..................................४९

४) वि. स. खांडेकर .............................................७१

५) व्ही. शांताराम ..............................................९५

६) शंतनुराव किर्लोस्कर .......................................१२७

७) बाबा आमटे ...................................................१५३

८) लता मंगेशकर ................................................१७३

९) डॉ. जयंत नारळीकर .......................................१९७

१०) सुनील गावसकर ............................................२३१

# प्रस्तावना

दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने -

'महाराष्ट्रातील अनमोल रत्ने' हे पुस्तक १९९१ साली प्रकाशित झाले होते. ९०-९१ हे वर्ष महात्मा फुले यांचे स्मृतिशताब्दी वर्ष तर डॉ. बाबासाहेब आंबेकर यांचे जन्मशताब्दी वर्ष होते. या वर्षात हे पुस्तक प्रकाशित करण्याचा योग प्राप्त झाला. माझ्या दृष्टीने ही अतिशय भाग्याची गोष्ट वाटते.

शाळेत शिक्षिका म्हणून अध्यापन करीत असताना या पुस्तकाची कल्पना मला सुचली. विद्यार्थ्यांना समाजातील समाजसुधारक, शास्त्रज्ञ, खेळाडू अशा मोठ्या व्यक्तींच्या जीवनातील अनेक घटना जाणून घेण्याचे कुतूहल असते. विद्यार्थ्यांना शिकवीत असताना त्यांनी अनेक व्यक्तींच्या बालपणातील प्रसंगाची माहिती विचारली. ही माहिती विद्यार्थ्यांना देतादेताच या पुस्तकाची निर्मिती झाली हे विशेष होय. अनेक विद्यार्थी, पालक, शिक्षक या पुस्तकाबद्दल सतत विचारणा करीत. त्यामुळे दुसऱ्या आवृत्तीचा विचार मनात आला. ही दुसरी आवृत्ती आपल्या हाती देताना एक वेगळा आनंद मिळाला.

महान व्यक्ती समाजाला दीपस्तंभासारख्या असतात. त्यांचे बालपण कसे असते? मोठेपणाचे काही विशेष गुण लहानपणासूनच त्यांच्याजवळ होते का? आयुष्यात त्यांना जे अलौकिकत्व प्राप्त झाले ते कोणामुळे? त्यांचे शिल्पकार कोण? आईवडील, शिक्षक, नातेवाईक इतकेच काय पण आपल्या शेजारी राहणारे शेजारी त्यांचाही मोलाचा वाटा असतो. कारण यश पाहून तेही कौतुक करीत असतात.

लहानपणी एखादी वाईट सवय असू शकते कधीकधी शिकण्याचाही कंटाळा येत असतो. यावर त्यांनी कशी मात केली? त्यांना स्वत:शी, समाजाशी संघर्ष करावा लागला का? यासारखे प्रश्न आपल्या मनात रेंगाळत असतात. या प्रकाराची विविध माहिती

संस्कारक्षम घटनांतून संस्कारीत होत असलेलं बालमन हे चित्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्वांचे बालपण अगदी वेगळे आहे. त्यांच्या उत्तुंग प्रतिभेची झाक त्यांच्या बालपणातच दिसते. लहानपणी त्यांनी स्वत:ला ज्या चांगल्या सवयी लावून घेतल्या त्याचा उपयोग पुढील जीवनात त्यांना कशाप्रकारे झाला याचेही चित्रण अनेक प्रसंगातून वाचायला मिळते.

मोठ्या व्यक्तींच्या बालपणावर त्यांच्या मातापित्यांनी केलेल्या संस्काराचा ठसा उमटलेला दिसतो. करड्या शिस्तीतून त्यांचे जीवन संपन्न झालेले दिसते. त्यांच्या बालपणातील अनेक प्रसंग आपल्या मनावर कायम कोरले जातात. मुलांच्या बरोबरच पालक, शिक्षक यांनी हे पुस्तक वाचावं अशी अपेक्षा आहे. अनेक व्यक्तींच्या या जीवनकार्यातून मुलांना प्रेरणा मिळून त्यातूनच एखादा मोठा खेळाडू, शास्त्रज्ञ, कलावंत बनू शकेल असा विश्वास वाटतो.

प्रत्येक मुलास वाटते की आपण खूप मोठे व्हावे, पण केवळ वयाने मोठे न होता किर्तीने मोठे झाले पाहिजे. यश प्राप्त करण्यासाठी अतिशय श्रम करावे लागतात. प्रसंगी प्राणाचं मोल देण्याची तयारी ठेवावी लागते. हे सर्व कोणासाठी तर केवळ आपल्या देशासाठी!

या पुस्तकात समाविष्ट केलेल्या थोर व्यक्ती या महाराष्ट्रातील असून त्या त्या क्षेत्रात त्यांनी मिळविलेले यश हे दैदिप्यमान आहे. त्यांना अनेक मानसन्मान व बहुमान मिळाले आहेत. त्यांचा हा गौरव त्यांचा तर आहेच त्याबरोबरच आपल्या समाजाचा, महाराष्ट्राचा आणि भारताचाही आहे.

समाजात वेगवेगळ्या क्षेत्रातील यश संपादन मिळवणाऱ्या व्यक्तींचे योगदान खूप मोठे असते. समाज अशा व्यक्तींचा ऋणी असतो. म्हणून त्यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे चैतन्याचा झराच! माणसातील माणूसपण हे जीवनाला संजीवनी देणारं ठरत असतं.

प्रत्येक क्षेत्रात आधी काम केलेल्या व्यक्तींनी यशाची एक मर्यादा

कायम केलेली असते. त्यांच्या क्षेत्रातील अशी रेषा भेदून जर ती व्यक्ती पुढे गेली तरच स्वतःला कर्तृत्वाचे वेगळे समाधान मानता येईल. यशाची कोणतीही व्याख्या नसते. प्रगतीच्या नवनवीन आयामांबरोबर ती व्याख्याही बदलत जाते. काळ इतका वेगवान आहे की, एखाद्या महिन्यापूर्वी वाटणारी अशक्य गोष्ट काही काळानंतर साध्य होऊ शकते. किंबहुना ते ध्येयच काळाच्याही पुढे जाते. रोज नवीन आव्हाने, नवीन अडचणी यांचा सामना करावा लागतो. यशामध्ये गुणवत्ता, चांगुलपणा, जिद्द, मेहनत यांचा वाटा प्रामुख्याने असतो. यश म्हणजे केवळ पैसा कमवणे नव्हे वा जगातील सर्व भौतिक सुख हाताशी असणं असंही नाही. जीवनात कामातील समाधान हेही तितकच महत्त्वाचं असतं.

माध्यमिक असो वा उच्च माध्यमिक, पाठ्यपुस्तकात थोर व्यक्तींच्या चरित्रातील काही भाग असतो. विद्यार्थी व शिक्षकांना पूरक वाचनासाठी हे पुस्तक अत्यंत उपयुक्त ठरेल. थोर व्यक्तींचे कार्य जाणून घेण्याची प्रत्येकाला उत्कंठा असते. त्या अनुषंगाने या महान व्यक्तींच्या जीवनातील प्रेरणादायी घटना व त्यांचे महान कार्य मुलांना त्यांच्या उच्च ध्येयाकडे वाटचाल करण्यासाठी दीपस्तंभासारखे उपयुक्त ठरेल.

कर्तृत्ववान व्यक्तींनी केलेल्या अतुलनीय कार्यामुळे देशाच्या लौकिकात मोलाची भर घातली जाते. त्याचप्रमाणे त्यांचे चरित्रही शतकानुशतके प्रेरणादायी ठरते. कोणत्याही क्षेत्रात नेत्रदीपक यश मिळविण्यासाठी तपश्चर्या करावी लागते. सभोवतालची परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी मुलांमुलीनी स्वतःमधील सुप्त गुणांची व कर्तृत्वशक्तीची अचूक ओळख करून घेतल्यास अपयशाची भीती वाटत नाही त्यावर सहजपणे मात करता येते. नेहमी आशावादी दृष्टिकोन ठेवला पाहिजे, मग काय जादू होते पहा, शिखर जरी गाठता आले नाही तरी पायथ्याशी जाऊन पोहचल्याचे समाधान तरी नक्की मिळू

शकते.

एखादी व्यक्ती जेव्हा मोठी होते तेव्हा ती व्यक्ती तर मोठी होतेच पण त्याबरोबरच तो समाज आणि देशही मोठा होतो. त्यांचे कार्य इतके व्यापक असते की, समाज त्यांचा शतकानुशतके ऋणी राहतो. म्हणून पुढील ओळी पुन्हापुन्हा मन:पटलावर उमटतात.

।। दिव्यत्वाची जेथ प्रचिती। तेथे कर माझे जुळती।।

कोमल प्रकाशनचे श्री गुरुनाथ शेट्ये यांनी हे पुस्तक आत्मीयतेने प्रकाशित केले. त्यांचे सहकार्य नेहमीच लाभते आहे. त्यांचे मनापासून आभार.

श्री. प्रकाश गवळी यांची तत्परता आणि दिलेले सहकार्य मनाला भावणारे आहे. त्यांच्याप्रती स्नेह आहेच. त्यांचे मन:पूर्वक आभार.

श्री. साकेत पाटील यांनी अतिशय सुंदर मुखपृष्ठ तयार करुन दिले त्यांचे ही आभार. नवी मुंबई हायस्कूल या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्यही वेळोवेळी मिळाले आहे. त्या सर्वांचे आभार.

विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि वाचक या सर्वांनाच हे पुस्तक आवडेल असा विश्वास वाटतो.

तिसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने -

वाचकांनी उत्तम प्रतिसाद दिल्यामुळेच तिसरी आवृत्ती निघू शकली. वाचकांचे मनापासून आभार.

**डॉ. उषा खंदारे**



**डॉ. उषा खंदारे**
एम.ए., एम.एड., पीएच. डी.

कर्तृत्ववान व्यक्तींनी केलेल्या अतुलनीय कार्यामुळे देशाच्या लौकिकात मोलाची भर घातली आहे. त्याचप्रमाणे त्यांचे चरित्रही शतकानुशतके प्रेरणादायी ठरते. कोणत्याही क्षेत्रात नेक्षदीपक यश मिळवण्यासाठी तपश्चर्या करावी लागते. सभोवतालची परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी मुलामुलींनी स्वत:मधील सप्त गुणांची व कर्तृत्वशक्तीची अचूक ओळख करुन घेतल्यास अपयशाची भीती वाटत नाही त्यावर सहजपणे मात करता येते. आशावादी दृष्टिकोन ठेवला पाहिजे. मग काय जादू होते पहा, शिखर जरी गाठता आले नाही तरी पायथ्याशी जाऊन पोहचल्याचे समाधान तरी नक्की मिळू शकते.

(प्रस्तावनेतून)

कोमल प्रकाशन

₹ ३००/-